आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
बुधवार, दिनांक १७ एप्रिल २०२४

ठळक बातम्या

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला प्रचाराचा आज शेवटचा दिवस; सर्वपक्षीय नेत्यांचा जनसंपर्कावर भर.

2. नागपुरात मतदानासाठी कडेकोट बंदोबस्त; नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन.

3. चालू आर्थिक वर्षात देशाचा जी डी पी दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील - आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज.

4. नागपूरसह विदर्भात रामनवमीचा उत्साह; प्राचीन पोद्दारेश्वर राम मंदिराच्या शोभायात्रेला सुरुवात.

*****

प्रचाराचा शेवटचा दिवस

परवा १९ एप्रिल रोजी पूर्व विदर्भातील ५ जिल्ह्यांत पहिल्या टप्प्यात लोकसभेच्या निवडणुका होत असून आज संध्याकाळी ६ वाजता प्रचार संपुष्टात आला. या टप्प्यात १७ राज्यातल्या १०२ मतदारसंघांमध्ये परवा १९ तारखेला मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली-चिमूर या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदानासाठी यंत्रणा सज्ज होत असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत. तत्पूर्वी सर्वपक्षीय नेत्यांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केल्याचं दिसून आलं. नागपूरच्या प्रत्येक भागात विकासकामं झाली. आपल्याला आणखी बरीच कामं करायची आहेत आणि शहराच्या चौफेर प्रगतीसाठी नागपूरकरांची साथ हवी आहे, असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज लाईव्ह संवादाच्या माध्यमातून मतदारांना केलं. गडकरी यांना आज वंजारी समूहानं आपला पाठिंबा जाहीर केला असल्याचं पत्र संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र बुट्टे यांनी गडकरी यांना दिलं असल्याचं सांगितलं. अखिल भारतीय मराठा महासंघानं देखील भाजप आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. मुंबईला झालेल्या कार्यक्रमात अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष दिलीप जगताप यांनी ही घोषणा केली. इंडिया आघाडीचे आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नागपूरचे उमेदवार विकास ठाकरे यांनी आज नागपुरात पत्रकार परिषद घेऊन भाजपचे उमेदवार नितीन गडकरी यांच्यावर टीकास्त्र

सोडलं. गडकरींनी मागील निवडणुकीत दिलेली लॉजिस्टिक पार्क, बसेस, पर्यटन केंद्रे, रोजगार निर्मिती आदींची आश्वासनं अद्याप पूर्ण केलेली नसून त्यांचे दावे खोटे असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. शहराचा विकास करताना त्याचा फायदा सर्वसामान्यांना होईल, त्याची उधळपट्टी होणार नाही, तसंच शहरातील मध्यमवर्गीयांच्या मूलभूत सेवा जसं वीज, पाणी, घर, सार्वजनिक स्वच्छता, रोजगाराच्या सोयी नियमित देण्याकडं माझा विशेष भर राहील, असं ठाकरे यांनी सांगितलं. काँग्रेसच्या ५ न्यायाबद्दल सांगताना महिलांना रोजगार, आणि प्रत्येक गरीब कुटुंबातील एका महिलेच्या खात्यात वार्षिक एक लाख रुपये देण्याची ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान, मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी भगवान श्रीरामाची पोस्टर्स वापरून आचारसंहितेचा भंग केल्यानं नितीन गडकरी यांची उमेदवारी रद्द करा, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी महाराष्ट्र निवडणूक अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. भाजपचा हा प्रकार अनैतिक असून धार्मिक मतदारांचं ध्रुवीकरण करणारा आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. रामटेक लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांच्या प्रचारार्थ काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचार रॅलीत सहभाग घेतला. आचारसंहिता संपल्यानंतर विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. नरखेड इथं आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.गोंदियात महाविकास आघाडीचे भंडारा -गोंदिया लोकसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ.प्रशांत पडोळे यांच्या प्रचारार्थ भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले देखील सहभागी झाले. डॉ पडोळे यांनी भंडारा जिल्यातील पवनी, साकोली, तुमसर आणि मोहाडी, तर गोंदिया जिल्यातील सडक अर्जुनी, मोरगाव अर्जुनी आणि गोरेगाव या तालुक्यात बाईक रॅली काढून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला, तर महायुतीच्या वतीनं भाजपचे सुनील मेंढे यांनी जनसंपर्क साधला. गडचिरोली इथं भाजपचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ सिने अभिनेत्री रिमी सेन यांच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. काँग्रेसचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रचारार्थ विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत गडचिरोली शहरातून रॅली काढण्यात आली. त्यानंतर वडेट्टीवार यांनी चामोर्शी इथल्या रॅलीलाही संबोधित केलं. दुपारी ३ वाजता प्रचार बंद झाला. ब्रम्हपुरी आणि चिमूर विधानसभा क्षेत्रात संध्याकाळी ६ वाजता प्रचार थांबविण्यात आला. दरम्यान, चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात पूर्वीच्या निवडणुकीत मतदानाची कमी टक्केवारी नोंदवणाऱ्या भागांकडं विशेष लक्ष पुरवण्यात येत आहे. मतदारांना प्रेरित करण्यासाठी विविध उद्योगांची मदत घेऊन ८५ मतदान केंद्रं सजवण्यात आली आहेत.

कडेकोट बंदोबस्त

१९ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानासाठी नागपूर शहर आणि ग्रामीण पोलिसांतर्फे कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. शहरात ८३९ इमारतींमध्ये २ हजार ७६५ मतदान केंद्र आहेत, तिथं ७ हजारांहून अधिक मनुष्यबळ तैनात करण्यात आलं आहे. यात तीन अपर आयुक्त, १० उपायुक्त, १७ सहायक आयुक्त, ३२१ इतर अधिकारी, ३ हजार २१८ पुरुष आणि ९४३ महिला कर्मचारी आहेत. निमलष्करी दलाच्या ४ सशस्त्र तुकड्या आणि एक हजार ८५० होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय स्ट्रॉंग रूम तयार करण्यात आली असून सायबर पेट्रोलिंग देखील सुरू करण्यात आलं आहे.

आवाहन

प्रत्यक्ष मतदानाची वेळ अगदी जवळ आली असून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्येक मत महत्वाचं आहे. शिवाय मतदानातूनच आपण आपलं आणि देशाचं उज्ज्वल भविष्य निश्चित करू शकतो. त्यामुळं मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भिडपणे मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सामील व्हा, असं कळकळीचं आवाहन जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून करण्यात आलं आहे. परवा १९ तारखेला पूर्व विदर्भातील ५ जिल्ह्यांत सकाळी ७ वाजेपासून मतदान करता येईल. दरम्यान, नागपूरमध्ये 75 टक्के मतदान झालं पाहिजे. सर्व मतदारांनी आपल्या मताधिकाराचा वापर करून नागपूरला डिस्टिंक्शनमध्ये पास करण्याचं  आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज आयोजित मतदान नियोजन विषयक बैठकीत केलं. 19, 20 आणि 21 एप्रिल असे सलग सुट्टीचे दिवस असल्यामुळं 19 तारखेला मतदान करून त्यानंतर आपण पुढं सुट्टीला जाऊ शकता. परंतु  19 ला मतदान न करता फक्त सुट्ट्याचाच विचार करून आपल्या राष्ट्रीय कर्तव्याला मुकू नये, असे देखील त्यांनी सांगितलं .

जीडीपी दर

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन दर अर्थात जी डी पी दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील, असं भाकीत आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात आय एम एफ नं वर्तवलं आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुकला दिलेल्या सुधारित अहवालात आय एम एफ नं, जानेवारीत दिलेल्या भाकीतापेक्षा ३० शतांश अंकांनी वाढ केली होती. जानेवारी महिन्यात हीच वाढ ६ पूर्णांक ५ दशांश  टक्के वर्तवण्यात आली होती. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये हीच वाढ ६ पूर्णांक ५ दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे. जी डी पी मध्ये होत असलेल्या या वृद्धीमुळं भारत जगातल्या सर्वात वेगानं  वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेनं आगेकूच करत आहे. देशांतर्गत उत्पादनांना वाढती मागणी आणि श्रमिक वयोगटातल्या  लोकसंख्येत होत असलेली वाढ, ही या वृद्धीदराची कारणं आहेत, असं आय एम एफ नं नमूद केलं आहे.

राम नवमी

रामनवमी आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. नागपुरात आज दुपारी १२ वाजता पोद्दारेश्वर मंदिरासह शहरातील विविध मंदिरांमध्ये रामजन्म साजरा झाला. रामटेकच्या प्राचीन गडमंदिरावर देखील रामनवमीचा उत्साह बघायला मिळाला. गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या रामाच्या नवरात्रात भजन-कीर्तन, व्याख्यान, अभिषेक इत्यादींचं सर्वत्र आयोजन करण्यात आलं होतं. नागपुरातील सेंट्रल एव्हेन्यू मार्गावरील पोद्दारेश्वर राम मंदिरातर्फे दरवर्षीप्रमाणं यंदाही शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. शोभायात्रेचं हे ५८ वं वर्ष आहे. शोभायात्रेला दुपारी ४ वाजता आरतीनंतर सुरुवात झाली. यावेळी पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित, रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आशिष जयस्वाल, विकास ठाकरे, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके आदींची प्रमुख उपस्थिती होती. यंदाच्या मिरवणुकीत अयोध्येतील श्रीरामचंद्रांच्या चित्ररथाचं विशेष आकर्षण आहे. पोद्दारेश्वर राम मंदिरापासून मिरवणूक नागपुरातील बडकस चौक, मुंजे चौक, सीताबर्डी कॉटन मार्केटमार्गे रात्री १२ पूर्वी पोद्दारेश्वर राम मंदिरात परत येणार आहे. शोभायात्रा बघायला रस्त्याच्या दुतर्फा आबालवृद्धांची गर्दी पाहायला मिळत असल्याचं आमच्या प्रतिनिधींनं कळवलं आहे. शोभायात्रा मार्गावर रांगोळया, फुलांची सजावट आणि आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. रामनामाच्या जयघोषासह, भजन-कीर्तन देखील शोभायात्रेचं वैशिष्ट्य आहे. दक्षिण-पश्चिम आणि उत्तर नागपूरमधून निघणाऱ्या शोभायात्रांचा उत्साह देखील शहरात बघायला मिळत आहे. आज सकाळी गोंदियात रामनवमीचं औचित्य साधून बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं. यवतमाळ जिल्ह्यातही रामजन्मोत्सव उत्साहात साजरा होत असून गावागावात प्रभू श्रीरामाच्या शोभायात्रा काढण्यात येत आहेत.सकाळी निघालेल्या प्रभातफेरीत रामभक्त पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले. अकोल्याच्या पुरातन मोठ्या राम मंदिरात अलोट गर्दी उसळली आहे.

उष्णतेची लाट

पूर्व विदर्भातील नागपूरसह सर्व जिल्ह्यात आज आणि उद्या हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. आगामी काही तासांत विदर्भाच्या अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, अवकाळी पाऊस पडून गेल्यानंतर विदर्भात उष्णतेत वाढ

होत असून लोकांनी उष्म्यापासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत विभागानं यापूर्वीच सूचना जारी केल्या आहेत.

<u>निवडणूक तिसरा टप्पा</u>
लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत परवा १९ तारखेला संपणार आहे, तर चौथ्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. चौथ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या ११ मतदारसंघांचा समावेश आहे. चौथ्या टप्प्यासाठी या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, १३ मे रोजी मतदान होणार आहे.

*****